**महाराष्ट्र शासन**
**ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**नगर भवन, मुंबई -४०० ००१**

# राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानअंतर्गत ४८व्या ग्रंथभेट योजनेसाठी सन - २०२१ या कॅलेंडर वर्षातील प्रकाशित ग्रंथ सादर करणेबाबत

सन २०२१ मध्ये प्रकाशित झालेले मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ग्रंथ प्राप्त करुन त्यातील उपयुक्त ग्रंथांची निवड करुन राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या 'ग्रंथभेट' या योजनेसाठी त्या ग्रंथांची खरेदी करण्यात येते. सदर ग्रंथ राज्यामधील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना देण्यात येतात. त्याअनुषंगाने सदर ग्रंथांची निवड करण्यासाठी तसेच सन २०२१ मध्ये प्रकाशित झालेले मराठी भाषेतील ग्रंथांची निवड करुन शासनमान्य ग्रंथांच्या यादीत समावेश होण्याच्या दृष्टीने, सन २०२१ या कॅलेंडर वर्षात **( दि. १ जानेवारी, २०२१ ते दि. ३१ डिसेंबर, २०२१) प्रकाशित झालेल्या ग्रंथांची ( प्रथम आवृत्ती) एक विनामुल्य प्रत Complimentary copy ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे दि. २८/०२/२०२२ रोजी पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. सदर दिनांकानंतर ग्रंथ प्राप्त झाल्यास त्याचा ग्रंथ निवडीसाठी विचार केला जाणार नाही. उपरोक्त योजनेसाठी यापूर्वी ग्रंथ संचालनालयास सादर केले असल्यास पुनश्च: सादर करण्याची आवश्यकता नाही.**

तसेच, मुद्रण व नोंदणी अधिनियम, १८६७ अन्वये मुद्रकाने व ग्रंथ प्रदान अधिनियम, १९५४ अन्वये प्रकाशकाने सदर ग्रंथाची प्रत्येकी एक प्रत राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, नगर भवन, मुंबई, शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे व शासकीय विभागीय ग्रंथालय, नागपूर येथे पाठविणे आवश्यक आहे. सदर ग्रंथ पोहोचल्याची पोच पावती संबंधीत ग्रंथालयांकडून घ्यावी. ग्रंथालय संचालनालयास संबंधित ग्रंथ पाठवितांना वरीलप्रमाणे ग्रंथ पाठविल्याची पोच पावती ग्रंथांसोबत टपालामार्फत वा समक्ष पाठविण्यात यावी. सदर पोच संचालनालयास मिळाल्याची खात्री झाल्यानंतरच सन २०२१ मध्ये प्रकाशित ग्रंथ अंतिमत: ग्रंथ निवडीसाठी ग्रंथालय संचालनालयामार्फत विचारात घेण्यात येतील. अधिक माहितीस्तव www.rrrf.gov.in हे संकेतस्थळ अवलोकावे.

**सदरचे निवेदन महाराष्ट्र शासनाच्या** www.maharashtra.gov.in **व ग्रंथालय संचालनालयाच्या** www.dol.maharashtra.gov.in **या संकेतस्थळांवर ठेवण्यात आले आहे.**

**(शालिनी गो. इंगोले)**
**प्र. ग्रंथालय संचालक**